(4)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सदर्भ क्र. :- शिवाजी वि./पीजी प्रवेश/पारितोषिक/केएसएस/ ९८३१/ दि. ३/१/२०१२

प्रति,

अधिविभागप्रमुख,
सर्व विद्यापीठ अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- "कै. डी. एस. तथा दादा चव्हाण पारितोषिक" च्या नियमावलीतील बदलाबाबत...

महोदय / महोदया,

श्रीमती कृष्णा ज्ञानदेव चव्हाण व चव्हाण कुटुंबिय यांनी दिलेल्या देणगीतून एप्रिल/ मे, २००० च्या परीक्षेपासून "कमवा आणि शिका" या योजनेअंतर्गत "डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" मध्ये राहून दोन वर्षे पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस देण्यासाठी "कै. डी. एस. तथा दादा चव्हाण पारितोषिकाची" निर्मिती केली आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, ""कै. डी. एस. तथा दादा चव्हाण पारितोषिका" च्या नियम क्र. ४ व ५ मध्ये बदल करण्यात आला आहे. सदर बदल पुढीलप्रमाणे

प्रचलित नियम क्र. ४ :-

देणगी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून येणाऱ्या रक्कमेपैकी रू.७००/- एवढया रक्कमेचे पारितोषिक देण्यात यावे व व्याजातील काही रक्कम शिल्लक राहील्यास ती मूळ रक्कमेत जमा करावी.

प्रचलित नियम क्र. ५ :-

या पारितोषिकाची अंमलबजावणी एप्रिल /मे, २००० च्या परिक्षेपासून करण्यात यावी.

सुधारित नियम क्र. ४ :-

देणगी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून येणाऱ्या रक्कमेपैकी रू.१२००/- एवढया रक्कमेचे पारितोषिक देण्यात यावे व व्याजातील काही रक्कम शिल्लक राहील्यास ती मूळ रक्कमेत जमा करावी.

सुधारित नियम क्र. ५ :-

या पारितोषिकाची अंमलबजावणी एप्रिल /मे, २०१२ च्या परिक्षेपासून करण्यात यावी.

तेव्हा कृपया सदरची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
(सही)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी

१. श्रीमती कृष्णा ज्ञानदेव चव्हाण व चव्हाण कुटुंबिय (देणगीदार),
२३४२, बी वॉर्ड, देवणे गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर.

माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१. परीक्षा विभाग (इतर परीक्षा विभाग १ ते ३ व एम.एस्सी. परीक्षा विभाग
२. दीक्षांत विभागाने देणगीदारांना दीक्षांत समारंभास निमंत्रित करावे.
३. प्रसार पत्रके विभाग
४. मा. अध्यक्ष, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -

"कै.डी.एस.तथा दादा चव्हाण पारितोषिकाचे विनियम"

१] या पारितोषिकाचे नामाभिदान कै.डी.एस.तथा दादा चव्हाण पारितोषिक" असे राहील.

२] शिवाजी विद्यापीठात "कमवा आणि शिका" या योजनेअंतर्गत "डॉ.आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" मध्ये राहून दोन वर्षे पदव्युत्तर शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस हे पारितोषिक दिले जाईल.

३] पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनीस निवडताना खालील बाबींचा विचार होईल.

अ] विद्यार्थ्याची २ वर्षाच्या वास्तव्यातील गुणवत्ता.
ब] त्याची वर्तणूक व चारित्र्य.
क] क्रीडा नैपुण्य, युवा सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग व सार्वजनिक योगदान.

४] देणगी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून येणाऱ्या रक्कमेपैकी रु.७००/- एवढया रक्कमेचे पारितोषिक देण्यात यावे व व्याजातील काही रक्कम शिल्लक राहील्यास ती मूळ रक्कमेत जमा करावी.

५] या पारितोषिकाची अंमलबजावणी एप्रिल/मे २००० च्या परिक्षेपासून करण्यात यावी.

६] सदरचे पारितोषिक संबंधित विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस टपाल सेवेने देण्यात यावे.

७] देणगीदारांना दिक्षांत समारंभास निमंत्रित करावे.

८] "आदर्श" विद्यार्थ्याची निवड करण्यासाठी दरवर्षी मा.कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली समिती गठन करण्यात यावी.

९] पारितोषिक संदर्भातील सर्व हक्क विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहतील.

प्र-उपकुलसचिव
[ऑफि.२]

सूचना:- सदरचे विनियमास दि. १७ जून २००० च्या व्य.प.ने मान्यता दिली आहे.